# बृ. म. मंडळ अधिवेशन- २०१३ एक सुखद अनुभूती

आयुष्यात पहिल्यांदा जात होते प्रॉव्हिडन्स (ऱ्होड आयलंड) शहरात. कारण, बृहन्महाराष्ट्र मंडळाचं १६ वं अधिवेशन. खूप उत्सुकता होती. खूप ऐकलं होतं. ते सगळं अनुभवायचं होतं. जूनच्या शेवटच्या आठवडयात सतत बीएमेम वेबसाईटवर पहात होते. संगीत, नृत्य आणि नाटकं यांची तर मेजवानीच होती.

मी प्रथमच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला येत होते. सगळ्या गोष्टींचा मी मनापासून आनंद लुटला. भारतातून आलेले कार्यक्रम व्यावसाईक कलाकारांनी सादर केलेले होते. ते तर उत्तमच होते. पण उत्तर अमेरिका खंडामधल्या कलाकारांनी सुखद धक्का दिला.

'सा रे ग म' असो की 'स्वरगंगेच्या काठावरती' सारख्या नृत्यनाटिका, कानाला सुख देणारे आणि डोळे दिपवून टाकणारे कार्यक्रम होते. 'कला' या संस्थेची नाटकं तर एका पेक्षा एक सरस होती. माझ्यासारख्या नाटकवेड्या व्यक्तीसाठी तर पर्वणीच होती. त्यांचं 'चाहूल' हे नाटकं अप्रतीम !! एक वेगळा, गंभीर विषय असूनही उत्कृष्ट संवादलेखन आणि मांडणी यांच्या मदतीने केवळ दोन कलाकारांनी पूर्ण वेळ आम्हा प्रेक्षकांना बांधून ठेवलं होतं. हा विषय कुठेही बटबटीत होऊ न देता प्रेक्षकांपर्यंत परिणामकारकरित्या पोचला यात मला वाटतं की नक्कीच दिग्दर्शनाचा वाटा आहे. त्या नाटकाच्या शेवटी कलाकारांची ओळख करून देताना नाटकाचे दिग्दर्शक मुकुंद मराठे यांनी 'समीप' बद्दल माहिती सांगितली. 'समीप' ची नाटकं पाहणं हा मला एक वेगळा अनुभव होता. आम्हा प्रेक्षकांच्यात ते नाटकं घडत होतं. आम्ही त्या नाटकाचा भाग होतो कारण कलाकार आमच्या पासून दोन फुटांवर होते. या कलाकारांपैकी काहींनी त्या एकांकिका लिहिल्या होत्या. संहितेची घट्ट बांधणी आणि सकस अभिनय याची चपखल उदाहरणं म्हणजे या एकांकिका असं म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही. नैसर्गिक अभिनय, मोजकं नेपथ्य आणि साजेसं पार्श्वसंगीत यामुळे या पूर्णपणे तीन वेगळ्या विषयांवरच्या तीनही एकांकिका अतिशय परिणामकारक वाटल्या. पुढचं अधिवेशन लॉस अँजलिसला आहे. त्यामुळे 'कला' -(CALAA)ची मेजवानी आम्हाला पुढच्या अधिवेशनातही मिळेल अशी खात्री वाटते.

प्रॉव्हिडन्स (ऱ्होड आयलंड) शहरातील यंदाचं बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन यशस्वी होण्यासाठी ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद! लॉस अँजलिसच्या अधिवेशानाबद्दल उत्सुकता नक्कीच वाढली आहे.

**- प्रज्ञा आपटे** (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)